पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर-४१३२५५ महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१-७३ (११ लाईन्स) फॅक्स-०२१७-२३५१३००
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: registrar@sus.ac.in / fao@sus.ac.in
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/खभांवि/२०२६/ 784

दिनांक 29 JAN 2026

प्रति,

--------------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या आवक जावक विभागासाठी सन २०२६ पासून कुरिअर सेवा पुरविण्यासाठी ३ वर्षाचा दरकरार करणेकरिता दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उपरोक्त नमूद विषयाप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके मागविण्याबाबत आपले अपेक्षित दर GST सह दरपत्रक भरुन मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या *http://su.ac.in* या संकेतस्थळावर (Quotation) या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

| अ.क्रं | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | २९/०१/२०२६ | | कुलसचिव कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | २९/०१/२०२६ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | ०५/०२/२०२६ | सायं.६.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | ०६/०२/२०२६ | दुपारी ३.३० | |

(डॉ. अतुल लकडे)
**प्र-कुलसचिव**

# सुचना व अटी

०१ दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.

०२ दरपत्रके दोन लिफाफा पदधतीने सादर करणे आवश्यक आहे. **कुरिअर सेवा पुरविण्यासाठी ३ वर्षाचा दरकरार असा स्पष्ट उल्लेख तांत्रिक व दराच्या लिफाफ्यावर स्वतंत्रपणे करावा.**

०३ लिफाफा क्रं.१ (तांत्रिक निविदा):- हा तांत्रिक बाबीसाठी असुन त्यावर तांत्रिक दरपत्रक असे नमुद करावे. व त्यामध्ये दरपत्रकेतील सही व शिक्का सुचित केलेल्या सुचना व अटी, तसेच शॉप ॲक्ट, पॅन कार्ड, GST Registration Certificate, (वस्तु व सेवाकरिता नोंदणी प्रमाणपत्र), तसेच राष्ट, राज्य, व जिल्हे इ. ठिकाणी कुरिअर सेवा उपलब्ध असल्याचे केपनीचे माहितीपत्र, इ. साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडून सिलबंद पाकीटातुन द्यावेत.

(सेवाकर नोंदणी नसल्यास त्याबाबतचे कारण व करकपाती संदर्भात काही दायीत्व निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित फर्मची राहील याचे हमीपत्र तांत्रिक दरपत्रके सोबत जोडावे.)

०४ लिफाफा क्रं. २ (दराची निविदा):- हा दरपत्रकासाठी असुन त्यावर दराचे दरपत्रक असे नमूद करावे. व त्यामध्ये दरपत्रकेतील पृष्ठ क्र ४ वर दर नमूद करून सही शिक्यासह सिलबंद पाकीटातुन द्यावेत.

०५ दर कराराबाबत वाटाघाटी करण्यात येणार नसल्यामुळे फर्मने जास्तीत जास्त न्युनतम दर द्यावेत. दरपत्रके मधीन नमुद दर हे अंतिम राहतील.

०६ दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी न केलेली/ दरपत्रकामध्ये खाडाखोड अथवा दरुस्तीसाठी व्हाईटनर लावलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

०७ दरपत्रक मान्य करताना फक्त दराचाच विचार केला जाणार नसून नमूद कंपनीचा तसेच पुरवठादाराच्या तात्काळ सेवासंहितेचा विचार केला जाईल.

०८ काही कारणाने पुरवठादाराने कराराच्या मुदतीत कुरीअर सेवा पुरविण्याचे नाकारले तर विद्यापीठ खुल्या बाजारातुन सदर सेवा घेईल व नुकसान झाल्यास त्याची वसुली पुरवठादाराकडुन केली जाईल.

०९ ठेकेदारास वरील अटी व नियम मान्य असल्यास स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहुन द्यावा लागेल.

१० दरकराराचा कालावधी तीन वर्षाचा राहील. विद्यापीठास आवश्यकता वाटल्यास सदर करारास मुदतवाढ देण्यात येईल.

११ ज्या फर्मचे दर न्युनतम आहेत अशा फर्म सोबत करार करण्यात येईल. तसेच एकापेक्षा जास्त पुरवठादारानी समान दर दिले असल्यास त्याची सेवा विचारात घेऊन व त्यावर कुरिअर सेवा घेण्याचे अधिकार विद्यापीठास राहील.

१२ कुरिअरचे दर सर्व करासहित (Including GST किंवा Excluding GST) व कार्यालयात पोहोच किंमतीसह द्यावेत.

१३ वस्तु व सेवाकर दि. ०१/०७/२०१७ पासुन लागू झाल्यामुळे देयक सादर करताना वस्तु व सेवा कराचा स्वतंत्र उल्लेख देयकांचे करार तसेच देयक हे GST Format मध्येच सादर करावे.

१४ शासनाकडून वेळोवेळी आकारणी करण्यात येणा-या देयकामधून कराची कपात करण्यात येईल.

१५ ज्या पुरवठाधारकाची दरपत्रक मान्य होईल त्या पुरवठाधारकास रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) इतकी सुरक्षा रक्कम मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्श्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे विद्यापीठातील वित्त व लेखा, रोकड विभागाकडे ऑनलाईन / एनएफटी, राष्ट्रीयकृत बँकेच्या डी. डी. ने भरावी लागेल. जर सुरक्षा ठेव रक्कम वेळेत जमा न केल्यास व त्यानंतर दरकरार न केल्यास आपले दरपत्रके रद्द करण्यात येईल. आपले नाव काळ्या यादीत टाकण्याच्या कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

१६ ज्या पुरवठाधारकाची दरपत्रक मान्य होईल त्या पुरवठाधारकास रु.५००/- च्या स्टँम्पवर करार करावा लागेल. (प्रस्तावित कालावधी तीन वर्षासाठी असेल)

१७ दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले आहेत.

१८ महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (शॉप ॲक्ट लायसन्स / उद्योग व आधार लायसन्स) मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचा संबधित खरेदी अथवा कामाशी संबंध असणे आवश्यक आहे. (संबधित साहित्य खरेदी व कामाचा अनुभव असणे बंधनकारक राहिल.)

१९ सुरक्षा ठेव पोटी विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेली रक्कम कराराचा कालावधी संपल्यानंतर व काम / सेवेबाबत समाधानकारकरित्या संपल्यानंतर पुरवठादारास मागणीप्रमाणे परत करण्यात येईल.

२० वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७३) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

२१ कुरिअर दरवाढीसंदर्भात किंवा इतर संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास याबाबत मा. कुलगुरु यांना निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार राहतील.

२२ कुरिअर सेवा पुरविण्यासाठी विद्यापीठातील सर्व टपाले पत्रे समक्ष येवून खात्री करून दररोज दुपारी ४.०० वाजता घेवून जावे लागेल याबाबत दिरंगाई झाल्यास व त्यामुळे विद्यापीठाचे नुकसान झाल्यास त्याची वसुली पुरवठादाराच्या सुरक्षा ठेव मधुन करण्यात येईल.

२३ सदर सुचना व अटी मान्य असल्याची स्वाक्षरी व शिक्का असलेले दरपत्रक तसेच सोबत जोडलेले हमीपत्र (Declaration) भरुन स्वाक्षरी व शिक्कासह जोडणे बंधनकारक असेल त्या शिवाय दरपत्रकाचा स्विकार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का

# अंदाजपत्रक [Shedule B]

*{दरपत्रक हे फर्मच्या लेटर हेडवर सादर करावे (To be printed on letter Head)}*

**प्रति,**

**दि.**

मा. कुलसचिव,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या आवक जावक विभागासाठी सन २०२६ पासून कुरिअर सेवा पुरविण्यासाठी ३ वर्षाचा दरकरार करणेकरिता दरपत्रके मागविणेबाबत...**

**महोदय,**

वरील विषयांकित साहित्य आम्ही खालील नमूद दराप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहोत.

| अ.क्र. | तपशील | दर सर्व करासहीत पोहच देणे प्रत्येकी २०० ग्रॅमपर्यंत | दर सर्व करासहीत पोहच देणे प्रत्येकी २०० ग्रॅमपुढील | टपाल पोहचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर शहर | | | |
| २ | संपूर्ण सोलापूर जिल्हा | | | |
| ३ | संपूर्ण महाराष्ट्र | | | |
| ४ | आंतरराज्य | | | |

***वरील दर हे सर्व करासहीत आहेत.**

उपरोक्त दराप्रमाणे मी/आम्ही काम करण्यास तयार आहोत.

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

## DECLARATION

I ______________________________________________ hereby Declare that, our firm ________________________________is not Black listed, debarred or prohibited by Government of India or any other Government, Union Authority or Organization or University. I further declare that, no case/s, criminal or Civil or Enquires of any kind are pending or settled between our firm and Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University before judicial and quasi-judicial authority. If any civil and criminal case is found pending against university is right to action against us.

**Name of the Bidder/**
**Firm, Seal & Signature**